REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २१ फेब्रुवारी, १९४० अंक ८

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

### दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

अप-टु-डेट शिलाईकरितां
महिंद्रकर ब्रदर्स
यांचेकडे चौकशी करा.
१२ तासांत कपडे शिवून मिळतील.
बुधवार चौक, पुणें
खादी भांडाराचे माडीवर

# विविध माहिती

### इंग्लंडमधील घरें

इंग्लंडमध्यें १८९१ सालीं ५४½ लक्ष घरांत मिळून २ कोटि, ९० लक्ष लोक रहात होते; म्हणजे प्रत्येक घरांत पांच अशी सरासरी पडली. १८२१ सालीं २० लक्ष, ८८ हजार घरांत मिळून १ कोटि, २० लक्ष लोक रहात होते. १९२१ सालीं इंग्लंडांत ४ कोटि लोकसंख्या होती, आणि घरांची संख्या ९१ लक्षांपेक्षा अधिक भरली. त्या वर्षानंतर इंग्लंडमध्यें नवीन घरांची भर मोठ्या प्रमाणावर पडूं लागली. सरकारनें ३ लक्ष, ८५ हजार घरें बांधण्यास मदत केली. पूर्वींच्या मानानें आतांचीं घरें जरा लहान असलीं, तरी गरीबांसहि विजेचा फायदा मिळूं लागला आहे, आणि आरोग्यदायक सुधारणा त्यांच्या वांट्यास येऊं लागल्या आहेत. बहुतेक घरांचे भोंवतीं बागा आहेत.

### मोठीं गिऱ्हाइकें

ब्रिटिश कारखान्यांचें सर्वांत मोठें गिऱ्हाइक म्हणजे ब्रिटिश सरकार हें होय. ग्रेटब्रिटनमधील एकूण खरेदीपैकी एक चतुर्थांश खरेदीस तेथील सरकार कारणीभूत होतें. त्याचे खालोखाल तेथील रेल्वेजची खरेदी असते. त्याच्या सुमारें २० हजार इंजनांस दरसाल १½ कोटि टन कोळसा लागतो. रेल्वेज प्रत्येक वर्षी २ कोटि विटा आणि २ लक्ष, ५७ हजार टन रूळ खरेदी करितात. दरसाल १,४५० मैल लांबीचा रेल्वे-रस्ता दुरुस्त करण्यांत येतो, त्यासाठी ४० लक्ष स्लीपर आणि १७ लक्ष चौरस वार खडी लागते.

### खाणींतील अपघात

जगांतील सर्व कोळशाच्या खाणींत मिळून चालू शतकांत एकूण २ लक्ष कामगार मरण पावले आणि १½ कोटि कामगारांस जबर दुखापती झाल्या. दरसाल ५ हजार लोक कामास येतात आणि ४ लक्ष लोक जखमी होतात. ग्रेटब्रिटनमधील प्रत्येक १,००० कामगारांपैकी किमान २०० तरी लोकांस इतकी दुखापत होते, कीं त्यांस वर्षांतून निदान ३ दिवस तरी कामावर जातां येत नाहीं. जपानमधील खाणींत सर्वांत अधिक आणि हॉलंडमध्यें सर्वांत कमी अपघात होतात.

### थिएटरांत स्त्रियांनीं हॅटस काढल्या पाहिजेत

रिओडिजानेरो येथील थिएटरांतील स्त्रियांनीं आपल्या हॅट्स काढल्यासेरीज तेथील खेळांस प्रारंभ होतां कामा नये, असा एक नियम करण्यांत आला आहे.

### कोयनेलची आयात—जर्मनीची जागा जपानें घेतली

चालू युद्धापूर्वी हिंदुस्थानांत जर्मनींतून फार मोठ्या प्रमाणावर कोयनेल येत असे. डिसेंबर, १९३८ मध्यें २,९४७ पौंड जर्मन कोयनेलची हिंदुस्थानांत आयात झाली; गेल्या डिसेंबरांत ती मुळींच झाली नाहीं. उलट, जपानमधून १९३८ च्या डिसेंबरांत फक्त ११८ पौंड कोयनेल आलें होतें, तें गेल्या डिसेंबरांत ९,९६० पौंड आलें.

### सक्कर धरणाखालील जमीन

सक्करच्या धरणामुळें सुमारें १० लक्ष एकर जमीन नव्यानें लागवडीखालीं आली आहे. सिंध सरकारास जमीनविक्रीचे सुमारें ४ कोटि रुपये मिळाले आहेत आणि जमीनदारांनीं वक्तशीर हप्ते न भरल्यामुळें त्यांची १ लक्ष, १२ हजार एकर जमीन सरकारनें जप्त केली आहे.

### सर्वांत मोठें!

जगांतील सर्वांत मोठें शेत रशियांत आहे. त्याचें क्षेत्र ६ लक्ष १० हजार एकर आहे, जगांतील सर्वांत खोल कोळशाची खाण ब्राझीलमध्यें आहे, त्याची खोली ६,४२६ फूट आहे. सर्वांत उंच चर्च जर्मनींत आहे, त्याची उंची ५३२ फूट आहे. सर्वांत मोठा आगबोटींचा कालवा ११५ मैल लांब आहे, तो स्वीडनमध्यें आहे. सर्वांत मोठें स्टेशन वॉटर्लूचें आहे; त्यानें २४½ एकर जागा व्यापली आहे.

### रशिया

रशियाचें खरें नांव "युनियन ऑफ सोव्हिअट सोशॅलिस्ट रिपब्लिक्स" असें आहे. थोडक्यांत त्यास यू. एस. एस. आर. असें म्हणतात. त्यांत नऊ रिपब्लिकें आहेत, त्यांत (१) रशियन सोशलिस्ट फेडरल सोव्हिअट रिपब्लिक, (२) युक्रेन, (३) जॉर्जिया, (४) श्वेत रशिया, (५) टर्कमेनिस्टन, (६) युझबेकिस्टन, (७) टॅजिकिस्टन ह्यांचा समावेश होतो. रशियाचें क्षेत्रफळ ८० लक्ष चौरस मैल असून त्याची लोकसंख्या १७ कोटि आहे.

### ग्रेटब्रिटनचें भांडवल

ग्रेटब्रिटनचें सबंद जगांत मिळून सुमारें ५० अब्ज रुपये भांडवल विखुरलेलें आहे.

### राजेसाहेबांच्या प्रवासाचा खर्च

इंग्लंडचे राजेसाहेब आगगाडीनें प्रवास करतात, तेव्हां इतरांप्रमाणें त्यांसहि तिकिटें काढावीं लागतात. लंडनहून बालमोरलला ते जातात, तेव्हां त्यांच्या कुटुंबांतील मंडळींसाठी ते पहिल्या वर्गाचीं तिकिटें काढतात आणि खास आगगाडीतून प्रवास करण्याबद्दल ते प्रत्येक मैलास १२ रुपये प्रमाणें स्वतंत्र रकम देतात. अशा रीतीनें लंडनहून बालमोरलला जाऊन येण्यास परतीचें भाडें सुमारें १४ हजार रुपये पडतें. बालमोरलला जाण्यासाठी बॅलेटर ह्या स्टेशनवर उतरावें लागतें.

### १५ भाषांतून ब्रॉडकास्टिंग

ग्रेटब्रिटनमधून आतां १५ वेगवेगळ्या भाषांतून ब्रॉडकास्टिंग करण्यांत येतें.

### लंडनची वाढती लोकसंख्या

लंडन शहराच्या लोकसंख्येंत दरसाल सुमारें ८० हजारांची भर पडते.

### युद्धोपयोगी सामग्री

युद्धापूर्वी ग्रेटब्रिटनमध्यें १८ महिन्यांत जेवढ्या लष्करी बुटांचें उत्पादन होत होतें, तेवढें आतां एक आठवड्यांत खपूं लागलें आहे.

### गेलें महायुद्ध

गेल्या महायुद्धांत दोस्त राष्ट्रांस रोजीं ७½ कोटि रुपये खर्च आला. त्या युद्धांत एकूण २७ राष्ट्रांनीं भाग घेतला. युद्ध ४ वर्षं आणि ३ महिने चाललें आणि त्यांत ७½ लक्ष सैनिक मृत्युमुखीं पडले.

### आयातीपूर्वी चौकशी

माल कोठून आला, कोणी पाठवला, इत्यादिबाबत ठरलेल्या नमुन्याप्रमाणें तपशील दिल्यासेरीज खालील तटस्थ राष्ट्रांतून हिंदुस्थानांत माल आयात होऊं दिला जात नाहीं:—अल्बेनिया, बेल्जम, बल्गेरिया, डेन्मार्क, एस्टोनिया, फिनलंड, ग्रीस, हंगेरी, आइसलंड, इटली, लॅटव्हिया, लिथ्वेनिया, नेदरलँड्स, नॉर्वे, पोर्तुगाल, रुमानिया, स्पेन, स्वीडन, स्वित्सर्लंड, तुर्कस्तान, युगोस्लाव्हिया, इत्यादि.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ८६ | ५ जादा नफ्यावरील करा-बद्दल तीव्र नापसंती... | ९१ |
| २ हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक | ८७ | ६ इंग्लंडच्या वैभवाचें रहस्य | ९३ |
| ३ हिंदी रिझर्व्ह बँक ... | ८८ | ७ शांततेचा काळ, हा अपवाद होय ! ... ... | ९३ |
| ४ स्फुट विचार — सहकारी लोकमतास सरकारनें मान दिला-युद्धाच्या ज्वाळा भडकण्याची भीति-तटस्थ राष्ट्रांची कुचंबणा-लष्करी घोंगड्या-हातमागाच्या धंद्यास संधि | ८९ | ८ तेव्हां आणि आतां... | ९४ |
| | | ९ निवडक बाजारभाव | ९५ |


# अर्थ

बुधवार. ता. २१ फेब्रुवारी, १९४०

## हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक

हिंदुस्थान सरकारचे वहातुक खात्याचे प्रमुख, सर ॲन्ड्र्यू क्लो, ह्यांनीं १९४०-४१ चें हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक गेल्या आठवड्यांत मध्यवर्ती असेंब्लीस सादर केलें. प्रथम त्यांनीं चालू वर्षाच्या परिस्थितीचा आढावा घेतला. गेल्या वर्षी केलेल्या अंदाजाप्रमाणें रेल्वेजना चालू वर्षाच्या कारभारांत २ लक्ष, १३ कोटि रुपयांचा वाढावा उरेल अशी अपेक्षा होती. तथापि, हा वाढावा ३ कोटि, ६१ लक्षांवर जाईल. अशी त्यांची अपेक्षा आहे. गेल्या वर्षापेक्षा यंदाचे वर्षी रेल्वेजना सुमारें २¼ कोटी रुपये उत्पन्न अधिक होईल असा अंदाज आहे. चालू वर्षाच्या मूळ अंदाजापेक्षा प्रत्यक्ष उत्पन्न २¼ कोटींनीं ज्यास्त भरेल. गेल्या वर्षापेक्षा खर्चांतहि १⅓ कोटींची वाढ होईल, असें दिसतें. अपेक्षित ३ कोटि, ६१ लक्ष रुपयांचा वाढावा मध्यवर्ती सरकारास दिला जाईल. ही रकम रेल्वेजनीं वास्तविक द्यावयाच्या रकमेपेक्षा ९० हजारांनीं कमी भरेल. १९४०-४१ मध्यें हिंदी रेल्वेजना एकूण १०३ कोटि रुपयांचें वहातुकीचें उत्पन्न होईल आणि त्या चालविण्याचा खर्च सुमारें ६६¾ कोटि रुपयांचा होईल. वाढावा ८ कोटि, २९ लक्ष रुपयांचा उरेल, त्यांतून ५¼ कोटि रुपये मध्यवर्ती सरकारास देतां येतील आणि सुमारें ३ कोटि रुपये गंगाजळींत टाकतां येतील, अशी अपेक्षा आहे. घसारा खात्यांत वर्षअखेर ३६ कोटि रुपये रहातील. सध्या चालू असलेलें युद्ध वर्षअखेर संपणार नाहीं आणि त्यामुळें रेल्वेवरील वहातुकींत वाढ होऊन उत्पन्न अधिक होईल ह्या अपेक्षेनें येत्या वर्षाचें अंदाजपत्रक तयार करण्यांत आलें आहे. उत्पन्नाबरोबर, अर्थात, खर्चांतहि वाढ होईल, परंतु रेल्वेजचे दर कायम ठेवले तर फक्त ३ कोटींचाच वाढावा उरून तो मध्यवर्ती सरकारचें देणें भागविण्यासहि पुरणार नाहीं, म्हणून रेल्वेजचे दर वाढविण्याविना गत्यंतर नाहीं. १ मार्च, १९४० पासून पुढीलप्रमाणें वाढ सुचविण्यांत आली आहे:—

(१) रेल्वेवरील मालवहातुकीच्या दरांत रुपयास दोन आणे वाढ. कोळसा, कोक, लष्करी उपयोगाच्या जिनसा, रेल्वेचें सामान, धान्य, खतें, इत्यादींस ही वाढ लागू नाहीं.

(२) सर्व उतारूंच्या भाड्यांत रुपयास एक आणा वाढ. १ रुपया खालील भाड्यांत वाढ होणार नाहीं. म्हणजे, ५० मैलांतील टापूंतील तिसऱ्या वर्गाचा प्रवास अधिक खर्चाचा होणार नाहीं.

चालू वर्षांत, दरामधील वरील वाढीपासून रेल्वेजना ३० लक्ष रुपये अधिक मिळतील आणि १९४०–४१ मध्यें त्यापासून ५¼ कोटि रुपये उत्पन्न अधिक मिळेल. वरीलप्रमाणें येत्या अंदाजपत्रकाचें स्थूल स्वरूप आहे. अपेक्षेप्रमाणें वाढलेल्या दरामुळें उत्पन्न अधिक झालें नाहीं तर मात्र अडचण येईल.

हिंदी रेल्वेजचा कारभार आज कित्येक वर्षे आंतबट्ट्याचा चाललेला आहे आणि त्यांचेपासून हिंदुस्थान सरकारास दरसाल उत्पन्न मिळून हिंदी नागरिकांवरील करभार त्या मानानें हलका होईल, ही अपेक्षा फोल ठरली आहे. रेल्वेजनीं मध्यवर्ती सरकारास दरसाल द्यावयाची रकम ही त्यांच्या वाढाव्यांतूनच यावयास पाहिजे आणि हा वाढावा त्यांच्या रोजच्या कारभारांतील उत्पन्न-खर्चांतूनच शिलक राहिला पाहिजे. तथापि, हिंदी रेल्वेज स्वतःच्या पायावर उभ्या रहात नाहींत; ह्यासाठी वहातुकीचे दर चढवून केवळ अधिकारानें उत्पन्न वाढविणें आणि त्यांतून मध्यवर्ती सरकाराची भरपाई करणें युक्त दिसत नाहीं. प्रत्यक्ष कर न बसवितां, अप्रत्यक्षपणें रेल्वेजचे दर वाढवून त्यांतून पैसा मिळविण्याचा हा प्रकार आहे. युद्धविषयक परिस्थितीचा फायदा घेऊन रेल्वेजनीं आपल्या दरांत केलेली वाढ कितपत समर्थनीय आहे ? हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. मालाच्या वहातुकीचे दर वाढल्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांवर अनिष्ट परिणाम होईल, हें उघड आहे. रेल्वे बजेटांत सुचविलेल्या दरांतील वाढीचा औद्योगिक कंपन्यांच्या भागांचे किंमतीवर शेअर-बाजारांत तात्काळ प्रतिकूल परिणाम झाला. रेल्वेचे दर वाढविण्यांत सरकारनें केवळ संधिसाधूपणा केला आहे असें म्हटल्यास त्यास सरकार काय उत्तर देईल ? ही वाढ मंजूर करतांना हिंदी उद्योगधंद्यांवर होणाऱ्या प्रतिकूल परिणामाचा विचार मध्यवर्ती असेंब्लीनें करणें आवश्यक आहे. सध्याच्या चढत्या बाजारभावामुळें रहाणीचा खर्चहि वाढत चालला आहे. रेल्वेजवरील वहातुकीच्या दरांत सुचविलेल्या वाढीमुळें रोजच्या गरजेच्या जिनसांची किंमतहि त्या मानानें अधिक होऊन सर्वसाधारण लोकांस त्यामुळें त्रास सोसावा लागेल. धान्य, खतें, इत्यादि मालास नवीन जादा दर लागू करण्यांत आले नाहींत, तरी इतर अनेक वस्तूंस ते लागू होतील आणि त्यामुळें आणखी महागाई होईल हें उघड आहे. म्हणजे, गरीब शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या अडचणींत ही आणखी एक भर पडणार आहे. रेल्वेवरील नोकरांचे पगारांत वाढ करणें आवश्यक झालें तर ज्या मालाचे दर वाढविण्यांत येत नाहींत त्याची माफी पुढें काढून घ्यावी लागेल असें आगाऊच सुचवून ठेवण्यांत आलें आहे. महागाईनिमित्त रेल्वे नोकरांस अधिक पगार मिळावा हें रास्त आहे, परंतु त्याचा आणि खाद्यपदार्थांच्या वहातुकीचे दराची माफी काढून घेण्याच्या प्रश्नाचा संबंध लावणें योग्य नाहीं. त्या पदार्थांचा वहातुकखर्च कांहीं झालें तरी वाढविला जातां कामा नये.

हिंदी रेल्वेजना लागणाऱ्या इंजनांचें उत्पादन हिंदुस्थानांतच करण्यांत यावें आणि त्या बाबतींत हिंदुस्थान सरकारनें पुढाकार घ्यावा, अशी हिंदी लोकांची फार जुनी मागणी आहे. आतां युद्ध परिस्थितीमुळें ग्रेटब्रिटनमधून हिंदुस्थानांत इंजनें येणें अशक्यप्राय झालें आहे. अशा रीतीनें इंजनांचे उत्पादनास येथें प्रारंभ करण्यास ही अनुकूल संधि आहे. ह्या प्रश्नाकडे आजवर हिंदुस्थान सरकारनें कानाडोळा केला, तथापि तो आतां हातीं घेणें त्यास आवश्यक झालें आहे. इंजनांच्या उत्पादनास खर्च काय येईल आणि तीं हिंदुस्थानांत तयार करणें किफायतशीर होईल किंवा नाहीं, ह्यासंबंधी चौकशी करून रिपोर्ट करण्याचें काम सरकारनें मि. जेहम्फ्रीज व मि. के. सी. श्रीनिवासन् ह्या दोघां तज्ज्ञांकडे सोंपविलें आणि त्यांनीं अनुकूल कौल दिला आहे. हिंदुस्थानांत इंजनें तयार करतां आलीं तरी त्यांस कायम मागणी राहील किंवा नाहीं, हीच शंका आजवर ह्या प्रश्नाचें पाऊल पुढें पडण्याच्या मार्गांत येत होती, परंतु ती भीति आतां राहिलेली नाहीं, असें ह्या तज्ज्ञांचें मत आहे. इंजनांच्या बनावटीस लागणाऱ्या वस्तूंपैकी कित्येक वस्तू परदेशांतून तूर्त आणाव्या लागतील, तथापि त्याहि पुढेंमागें हिंदुस्थानांत बनवितां येतील, असा ह्या तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. कोणत्याहि कारणानें इंजनांच्या उत्पादनाचा प्रश्न आतांपर्यंत मागें पडला असला तरी तीं ह्याचेपुढें तरी हिंदुस्थानांत बनविलीं जातील, असें दिसतें.

---

### ब्रिटिश रेडिओंची निर्गत

ग्रेटब्रिटनमधून रेडिओंची निर्गत वाढत आहे. १९३८-३९ मध्यें ८० हजार रेडिओ सेट्सची निर्गत झाली, १९४०-४१ मध्यें १½ लाखांवर ती जाईल, असा अजमास आहे.

### पेट्रोलची हिंदुस्थानांत आयात

| | गॅलन ( लक्ष ) | किंमत ( लक्ष रु. ) |
|---|---|---|
| डिसेंबर, १९३९ | ६१ | ३४½ |
| नोव्हेंबर, १९३९ | ६६½ | ४५½ |
| डिसेंबर, १९३८ | ६२ | २७½ |
| नोव्हेंबर, १९३८ | ८८½ | ३६½ |

वरील आकड्यांवरून पेट्रोलच्या किंमतीमधील वाढीची चांगली कल्पना येईल.

### नवीन पोस्ट ऑफिसें

१९३८-३९ मध्यें हिंदुस्थानांतील पोस्ट ऑफिसांच्या संख्येंत ३५४ ची भर पडली.

### हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

| | गाठी |
|---|---|
| १-१०-३८ ते ३१-१२-३८ | १०,०६,३७० |
| १-१०-३९ ते ३१-१२-३९ | १०,८०,०९४ |

### नवीन पावल्या

बाजारभाव वाढल्यामुळें सर्व प्रकारच्या नाण्यांस, विशेषतः पावल्यांस फार मोठी मागणी येऊं लागली आहे. निकेलच्या पावल्या काढण्याचें कांहीं वर्षांपूर्वीच योजविण्यांत आलें होतें. आतां निकेलच्या पावल्या न काढतां चांदीच्याच काढण्यांत येणार आहेत. सध्याच्या चांदीच्या पावलींत १२ मध्यें ११ भाग चांदी असते. ह्यापुढें निघणाऱ्या पावल्यांत फक्त निम्म्या वजमाचीच चांदी राहील.

## हिंदी रिझर्व्ह बँक

### नफा-तोटा पत्रक

( ३१-१२-३९ अखेरच्या वर्षाचें )

**उत्पन्न**

| | रु. |
|---|---|
| व्याज, डिस्कौंट, हुंडणावळ, कमिशन इ. | १,२२,९५,५०८-४-१० |

**खर्च**

| | |
|---|---|
| नोकरांचा पगार | ३४,९२,५६०-१२-१० |
| डायरेक्टर आणि लोकल बोर्डाचे सभासद ह्यांचा मुशाहिरा | ९८,९२६-२-६ |
| ऑडिटर्सचें वेतन | १२,०००-०-० |
| भाडें, कर, विमा, वीज इ. | ४,५५,२४३-४-० |
| कोर्ट वकील खर्च | १०,८७३-१५-० |
| पोस्टेज आणि तार | ६९,७१२-९-४ |
| पैसे पाठविण्यास खर्च | ११,२१,३७४-३-१ |
| स्टेशनरी | ८९,०८५-१२-५ |
| चेक, नोटा, इत्यादींची छापणावळ | १६,४७,७३३-३-२ |
| इमारतींचा पसारा व दुरुस्ती | १,४३,४६३-१४-२ |
| एजन्सी खर्च | २५,४४,४०१-९-८ |
| नोकर वर्गाच्या व इतर फंडाकडे वर्ग | ७७,७००-०-० |
| किरकोळ | २,८२,०७७-४-१ |
| वाढावा | २२,५०,३५५-१०-७ |
| | १,२२,९५,५०८-४-१० |

### बँकेस झालेला नफा

हिंदी रिझर्व्ह बँकेस ३१ डिसेंबर, १९३९ अखेर संपलेल्या वर्षी २२½ लक्ष रुपये निवळ नफा झाला. त्यांतून भागीदारांस ३½% डिव्हिडंड दिलें, म्हणजे ५ लक्ष रुपयांचा वाढावा उरतो, तो मध्यवर्ती सरकारास मिळेल.

### बँकेचे ऑडिटर्स

बँकेचे हिशेब मेसर्स एस. बी. बिलिमोरिआ आणि कं. ( मुंबई ), श्री. पी. के. घोष ( कलकत्ता ) आणि मेसर्स शास्त्री आणि शहा ( मद्रास ) ह्यांनीं तपासले.

### भागांची वाटणी

वर्षाचे प्रारंभीं भागीदारांची संख्या ५९,७७७ होती, ती वर्ष अखेर ५७,१९२ झाली. म्हणजे प्रत्येक भागीदार ८·४ भाग धारण करीत असे ती संख्या ८·७ झाली. बँक स्थापन झाली, तेव्हांचे मानानें भागीदारांची संख्या २८% नी कमी झाली आहे.

---

### गोखले दिन

ए. बा. गोपाळ कृष्ण गोखले ह्यांच्या मृत्युतिथिनिमित्त पुणें येथील डेक्कन सभेच्या विद्यमानें गोखले स्मारक मंदिरांत गेल्या सोमवारीं भावनगरचे प्रिन्सिपॉल टी. के. सहाणी ह्यांचें डॉ. र. पु. परांजपे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भाषण झालें. त्यांनीं नामदार गोखले ह्यांच्या बहुविध कामगिरीचें वक्तृत्वपूर्ण वर्णन केलें आणि तिच्यापासून आजच्या पिढीनें कोणता बोध घ्यावा हें सुंदर रीतीनें दर्शविलें. प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं वक्त्याचे आभार मानले आणि त्यांच्या भाषणांतील मुद्यांस दुजोरा दिला.

# स्फुट विचार

## सहकारी लोकमतास सरकारनें मान दिला

सहकारी बँकांच्या व्यवस्थापक मंडळाच्या घटनेंत महत्त्वाचे फेरबदल करण्याचा विचार मुंबई सरकारनें कांहीं महिन्यांमागें प्रदर्शित केला होता. ह्या व्यवस्थापक मंडळांत आजमितीस पतपेढ्या व वैयक्तिक सभासद ह्यांचे प्रतिनिधी निरनिराळ्या ठराविक प्रमाणांत असून कांहीं बँकांत सहकारी खात्यानें नेमलेला सभासद हि असतो. बँकांचे व्यवहार चोखपणाचे व्हावे आणि व्यवस्थापक मंडळांचा कारभार निःपक्षपातीपणाचा व कार्यक्षम व्हावा ह्या हेतूनें त्या मंडळांत सहकारी खात्यानें नेमलेले सभासद असावे आणि वैयक्तिक भागीदारांचे व पतपेढ्यांचे प्रतिनिधी विशिष्ट प्रमाणांत व विशिष्ट रीतीनें निवडलेले असावे असें सरकारच्या मनानें घेतलें. इतर प्रश्नांबरोबर ह्या प्रश्नाचा विचार सेंट्रल बँकांच्या प्रतिनिधींच्या एका परिषदेंत रजिस्ट्रारनीं केला. प्रत्येक बँकेची परिस्थिति स्वतंत्रपणानें लक्षांत घेतली जाऊन होईल तों पतपेढ्या व वैयक्तिक भागीदार ह्यांचे प्रतिनिधी समान प्रमाणांत रहातील अशी व्यवस्था असावी आणि सरकारनें असल्या बाबतींत हात घालून बँकांवर दडपण आणूं नये असें सर्वसाधारण मत परिषदेंत व्यक्त करण्यांत आलें. सरकारनें नेमलेले सभासद व्यवस्थापक मंडळांत असण्याची आणि वैयक्तिक भागीदारांच्या प्रतिनिधींवर मर्यादा लादण्याची विशेष आवश्यकता नाहीं असाहि सूर परिषदेच्या चर्चेंत स्पष्ट निघाला होता. असें झाल्यावरहि सरकारनें आपला आग्रह सोडला नाहीं आणि सहकारी कायद्याखालीं जे नियम करण्यांत आले आहेत त्यांत एक नवीन नियम दाखल करण्याचें व त्या अन्वयें सहकारी बँकांच्या व्यवस्थापक मंडळाच्या घटना स्वतःच्याच इच्छेप्रमाणें निश्चित करण्याचें त्यांनीं ठरविलें. बँकांच्या मध्यवर्ती मंडळानें सरकारच्या ह्या धोरणाविषयीं नापसंती व्यक्त केली आणि योजलेला नवीन नियम अनिष्ट व अग्राह्य असल्याविषयीं तक्रार केली. ह्या प्रतिकूल टीकेचा योग्य परिणाम होऊन मुंबई सरकारनें नवीन नियमाबाबतची कल्पना आपण सोडून दिली असल्याचें आतां जाहीर केलें आहे. संघटित सहकारी लोकमतास ह्या प्रमाणें मुंबई सरकारनें मान दिला ह्या बद्दल त्याचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. बँकांनीं एकत्र व शिस्तीनें आपल्या हितसंबंधीय प्रश्नांची चर्चा करून स्वतःचें धोरण ठरवण्याचें आणि सरकारनें त्यास आवश्यक तो मान देण्याचें महत्त्व प्रस्तुत प्रकरणापासून सिद्ध झालें आहे, ह्या गोष्टीकडे येथें लक्ष वेधणें अगत्याचें आहे.

---

## युद्धाच्या ज्वाला भडकण्याची भीति

अलीकडे युद्धपरिस्थिति बरीच अनिश्चित झाली असून तिला लौब फाटे फुटण्याची भीति उपस्थित झाली आहे. हवेच्या प्रतिकूलतेमुळें पश्चिम रणांगणांत विशेषशा हालचाली अशक्य झाल्या आहेत आणि समुद्रांत व हवेंत चकमकी सारख्या उडत आहेत. तटस्थ राष्ट्रांची व्यापारी जहाजें बुडवण्याचा सपाटा जर्मनीनें चालवला आहे. त्या योगानें स्वीडन, नॉर्वे, हॉलंड व डेन्मार्क ह्या देशांत अस्वस्थता निर्माण झाली आहे. इंग्लंडनें जर्मन व्यापाराची नाकेबंदी केली आहे, तिला हें जर्मनीचें उत्तर असल्याचें सांगण्यांत येत आहे. तटस्थ राष्ट्रांची इंग्लंडच्या विरुद्ध उठावणी करण्याचा हा जर्मनीचा प्रयत्न आहे. मधून मधून कांहीं ब्रिटिश जहाजांची हानी जर्मन पाणबुड्या व पाणसुरंग ह्यांचे योगानें होत असली तरी एकंदरीनें ब्रिटिश आरमाराचें समुद्रावरील वर्चस्व अबाधित आहे आणि इंग्लंडचा परराष्ट्रीय व्यापार व्यवस्थितपणानें चालला आहे. दक्षिण अमेरिकेच्या बाजूस अडकून पडलेलीं आपलीं जहाजें शत्रूच्या हातीं सापडण्याऐवजी बुडवणें जर्मनीस अधिक श्रेयस्कर वाटत आहे. ह्यावरूनहि ब्रिटिश आरमाराचें बळ स्पष्ट होत आहे. फिन्लंडमधलें रशियाचें युद्ध अगदीं निकरावर आलें आहे. त्या चिमुकल्या राष्ट्रानें प्रबळ प्रतिस्पर्ध्यास चांगलाच हात दाखवला आहे, तथापि बाहेरून पुरेसें मनुष्यबळ व युद्धसामुग्री मिळण्यावर त्याचें अंतिम यश अवलंबून आहे. रशियन चढाईमुळें नॉर्वे व स्वीडन ह्या देशांस स्वतःच्या संरक्षणाविषयीं काळजी वाटावयास लागली आहे. रशिया व जर्मनी ह्यांचें सूत जमल्यामुळें तीं राष्ट्रें ह्यानंतर कोणता डाव टाकतात ह्याविषयीं चिंतायुक्त कुतूहल चोहोंकडे पसरलें आहे. बाल्कन राष्ट्रांत गडबड करून तिकडून प्रतिस्पर्ध्यास शह देण्याचा त्यांचा विचार आहे कीं काय, ह्याविषयीं शंका येत असून त्या डावास तोंड देण्याची तयारी इंग्लंडनें चालवली आहे. पॅलेस्टाइनच्या व कैरोच्या बाजूस फौजेची मजबुती ह्या उद्देशानेंच करण्यांत येत असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. इकडे प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं युरोपमध्यें मि. सम्नर वेल्स ह्यांस पाठवून तिकडची परिस्थिति स्वतः अवलोकन करून विश्वसनीय माहिती मिळवण्याची व्यवस्था केली आहे. ह्याचा युद्धाच्या भवितव्यावर कांहीं विशेष परिणाम होतो कीं काय हें सांगतां येत नाहीं. ह्या रीतीनें युद्धास विस्तृत व आणीबाणीचें स्वरूप प्राप्त होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

---

## तटस्थ राष्ट्रांची कुचंबणा

तटस्थ राष्ट्रांची स्थिति अत्यंत अवघड झाली आहे. त्यांस दुसऱ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा अपहार करण्याचें जर्मनी व रशिया ह्यांचें धोरण नापसंत आहे. एवढेंच नव्हे, तर त्यांचा युद्धांत पराजय व्हावा व युरोपांत लवकर शांतता पुन्हां प्रस्थापित व्हावी, असें मनापासून वाटत आहे. परंतु त्यांस आपल्या दौर्बल्यामुळें युद्धांत दोस्त राष्ट्रांच्या बाजूनें आज पडतां येत नाहीं. हॉलंड, डेन्मार्क व बेल्जम हे देश जर्मनीच्या सीमेस लागले असून त्यांनीं स्वतःचें तटस्थ वृत्तीचें धोरण सोडून दिल्यास त्यांचेवर स्वारी करून त्यांस पादाक्रांत करण्यास जर्मनी मागेंपुढें पहाणार नाहीं. जर्मनीचें आर्थिक बळ खची करण्यासाठी जर्मन व्यापाराची नाकेबंदी करण्याचे हेतूनें ब्रिटिश आरमार तटस्थ राष्ट्रांच्या व्यापारी जहाजांची झडती घेत आहे, ह्या गोष्टींचा प्रतिकार त्या राष्ट्रांनीं परस्पर करावा अशी जर्मनीची इच्छा आहे. तसें तीं करीत नाहींत ह्या सबबीवर जर्मनी तटस्थ राष्ट्रांचीं व्यापारी जहाजें सांपडतलि तेथें बुडवीत आहेत. हें कृत्य बेकायदेशीर व असमर्थनीय असलें तरी जर्मनी त्याची पर्वा करीत नाहीं. ब्रिटिश आरमार शक्य तेवढें सहाय तटस्थ राष्ट्रांच्या व्यापारास देत आहे, पण ही मदत घेणें हा त्यांचा गुन्हा आहे असें भासवून जर्मनी त्यांचीं जहाजें बेगुमानपणानें बुडवीत आहे. अमेरिकेच्या धोरणासंबंधानें जर्मनी व रशिया साशंक आहेत आणि त्यांतल्या पक्षपातीपणाला दोष देत आहेत, दोस्त राष्ट्रांच्या बाजूनें युद्धांत पडण्याची ही अमेरिकेची पूर्व-

तयारी आहे असें त्यांचें म्हणणें आहे. तूर्त फिनलंडच्या आघाडीवर रशियानें आपलें शक्तिसर्वस्व जणूं कांहीं पणास लावलें आहे आणि फिनिश सैन्यें रशियाचे निकराचे हल्ले परतवीत आहे. ह्या बाजूच्या लढायांचा निकाल केव्हां व कसा होतो ह्यावर इतर रणांगणांतील हालचालींची दिशा अवलंबून आहे. रशिया व जर्मनी ह्यांचेमध्यें व्यापारी करार झाला असल्याचें प्रसिद्ध झालें आहे आणि रशिया जर्मनीस युद्धोपयोगी माल पुरवीत आहे असें दिसतें. बाल्कन देशांच्या बाजूस आणि तुर्कस्तानाच्या दिशेनें हालचाली करण्याचा रशियाचा बेत आहे कीं काय ह्याविषयीं संशय उत्पन्न होत आहे. युद्धक्षेत्राचा पूर्वेकडे विस्तार व्हावा अशी जर्मनीची इच्छा स्वाभाविकच असणार. दोस्त राष्ट्रांस ह्या बाजूस युद्धांत गुंतवण्याचा आणि पश्चिमेकडे आपला मार्ग सोपा करण्याचा जर्मनीचा डाव असला पाहिजे. तथापि, ह्याची तरतूद इंग्लंडनें अगोदरच चालवली आहे. रशियास स्वार्थबुद्धीनें जर्मनीनें प्रथम युद्धांस प्रवृत्त केलें. त्याचा उपयोग आणखीहि करून घेण्याचा हिटलरचा इरादा आहे. परंतु फिनिश आघाडीवर झालेली आणि होणारी त्याची हानी लक्षांत घेतां रशिया जर्मनीच्या बाल्कन-मधील व पूर्वेकडील धोरणास कितपत बळी पडेल ह्याची शंका आहे. एवंच, युद्ध लवकर आटोक्यांत येत नाहीं आणि त्यासाठी दोस्त राष्ट्रांस जय्यत तयारी केली पाहिजे हें उघड होत आहे. नात्सी पुढारी कांहींहि म्हणोत किंवा करोत, त्यांचेविषयीं जगांत क्वचितच सहानुभूति वाटण्याचा संभव आहे. जर्मनीचा अंतिम पराभव निश्चित आहे; तो घडवून आणण्यास जगास किती हानी सोसावी लागणार आणि युद्ध किती काळपर्यंत चालवावें लागणार एवढाच आज प्रश्न आहे.

---

### लष्करी घोंगड्या—हातमागाच्या धंद्यास संधी

युद्धांत फौजेच्या निरनिराळ्या अंगांच्या उपयोगासाठी विविध प्रकारांचे जिन्नस लागतात आणि ते मोठ्या प्रमाणावर तयार करावे लागतात. हिंदी उद्योगधंद्यांस ह्या बाबतींत भरपूर काम मिळण्यासारखें आहे आणि तें मोठ्या कारखानदारांप्रमाणें हातांनीं व लहान प्रमाणावर व्यवसाय करणाऱ्या कारागिरांसहि उपलब्ध होणें आवश्यक आहे. सध्या ब्रिटिश कारखान्यांवर नानातऱ्हेचा माल काढण्याचा एवढा ताण पडत आहे कीं, हिंदुस्थानांतून कांहीं विशिष्ट जातींचे युद्धोपयोगी जिन्नस पुरवतां येणें शक्य आहे. ह्याचें एक ठळक उदाहरण द्यावयाचें म्हणजे लष्करी ब्लँकेटांच्या पुरवठ्याचा उल्लेख करतां येईल. हिंदुस्थान सरकार ब्रिटिश सरकारासाठी साडेतीन लक्ष ब्लँकेटांची ऑर्डर ह्या देशांतील खेडे-गावी विणकरांस देण्यास तयार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. येत्या सप्टेंबर अखेर ब्लँकेटांचा पुरवठा व्हावयाचा असून त्याचें काम खेडेगावांतील कारागिरांचेंच असलें पाहिजे असा हिंदुस्थान-सरकारचा आग्रह आहे. प्रांतांच्या व संस्थानांच्या औद्योगिक खात्यांच्या अधिकाऱ्यांची एक परिषद् नुकतीच भरली होती, तीमध्यें युद्धोपयोगी मालाच्या पुरवठ्यासाठी स्थापन झालेल्या खात्याचे प्रमुख, मि. वाड, ह्यांनीं वरील बाबीचा उल्लेख केला आणि ब्लँकेटें पुरवण्याचें काम हातमागावर माल काढणाऱ्या विणकरांस मिळून त्यांच्या हातीं योग्य किंमत पडावी अशी इच्छा प्रदर्शित केली. हिंदुस्थान सरकारच्या त्या योजनेचा फायदा खेडेगावी धंद्यास पूर्णपणें मिळणें आवश्यक असून त्याविषयींची जरूर ती व्यवस्था प्रांतिक सरकारांच्या व संस्थानांच्या हातून होईल अशी आशा आहे.

---


## पूर्व खानदेश
## सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
### जळगांव.

( स्थापना : मे १९१६ ) रु.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. …… | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल…… | ४,६९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. …… | २,९८,०००।– |
| इतर फंडस्. …… | ३,७७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) …… | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के. व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणाराचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



## बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

☞ किं. १ रु. ८ आणे ☜

१ रु. १० आ. ची वै पी तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

श्री. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

" अर्थ " ग्रंथमाला, : : पुणें ४.

# जादा नफ्यावरील कराबद्दल तीव्र नापसंति

### व्यापारी व कारखानदार ह्यांची जाहीर सभा.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें, या संस्थेचे विद्यमानें सराफ असोसिएशन, हार्डवेअर अँड आयर्न मर्चंट्स असोसिएशन, टिंबर मर्चंट्स असोसिएशन, ब्रास अँड कॉपर मर्चंट्स असोसिएशन, पुणें कारखानदार संघ, इत्यादि पुण्यांतील संस्थांचे सहकार्यानें चेंबरचे अध्यक्ष, प्रो. वामन गोविंद काळे, एम्.ए., यांचे अध्यक्षतेखाली पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे सभागृहांत मंगळवार, ता. १३ फेब्रुवारी, १९४० रोजी ६-३० वाजतां जादा नफ्यावरील कराचे बिलास तीव्र विरोध व्यक्त करण्यासाठी सभा भरली होती. प्रथम अध्यक्ष प्रो. काळे यांचे प्रास्तविक भाषण झालें. ते म्हणाले;–

### प्रो. काळे यांचें भाषण

"चालू महायुद्धामुळें हिंदुस्थानांतील मोठमोठ्या कंपन्यांना व व्यापाऱ्यांना खूप फायदा होईल आणि या जादा फायद्याचा कांहीं अंश सरकारला मिळावा असें दिसण्यास साधें. पण व्यवहारांत स्वदेशी उद्योगधंद्यांना मारणारें घातक तत्त्व या बिलांत समाविष्ट करण्यांत आलें आहे. या बिलाचें कायद्यांत रूपांतर झालें म्हणजे त्या कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रारंभ १ एप्रिल १९३९ पासून धरण्यांत येणार आहे. युद्धामुळें होणाऱ्या जादा नफ्यावर जर कर घ्यावयाचा तर तो युद्ध सुरू झाल्यावेळेपासून म्हणजे सप्टेंबर, १९३९ अखेरपासून घ्यावयास पाहिजे. पण तसें न करतां युद्धपूर्व सहा महिन्यांपासून सरकार हा कर व्यापाऱ्यांच्या डोक्यावर बसविणार आहे. हा शुद्ध अन्याय आहे.

### इंग्लंड आणि हिंदुस्थान ह्यांतील परिस्थितीमधील फरक

"युद्धामुळें हिंदुस्थानचा किती फायदा झाला हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. युद्धामुळें इंग्लंडमधील व्यापाऱ्यांचा इतका फायदा झाला तेव्हां हिंदुस्थानांतील व्यापारी व कारखानदार यांचाहि झालाच असला पाहिजे असली निराधार आणि भ्रामक समजूत करून घेऊन, इंग्लंडनें जसा जादा नफ्यावरील कराचा कायदा केला तसाच हिंदुस्थानांतहि करण्यास हरकत नाहीं असला सरकार युक्तिवाद करीत आहे. तथापि १९३७ सालापासून इंग्लंडमधील उद्योगधंद्याची चलती आहे तर हिंदुस्थानांतील स्वदेशी उद्योगधंद्याची घसरगुंडी चालू आहे असें दिसून येतें. अद्याप स्वदेशी उद्योगधंद्यांची घडी बसावयाची आहे; मग जादा फायदा तर लांबच राहिला. उद्योगधंदे व फायदा यांचें व्यस्त प्रमाण असतां सरकार म्हणतें, आम्ही तुमच्या फायद्यांतला पन्नास टक्के फायदा घेणार. अशा स्थितींत नवे उद्योगधंदे काढणार कोण व व्यापारांत भांडवल गुंतविणार कोण? आणि मग सरकारचा उद्देश सफळ होणार कसा? युद्धामुळें उद्योगधंद्यांना थोडी चालना मिळेल; चार पैसे हातांत खेळूंहि लागतील; पण व्यापाऱ्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, युद्ध संपल्याबरोबर एकदम व्यापार मंदावेल व सगळ्या जगाशीं हिंदुस्थानाला स्पर्धा करावी लागेल. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या देशांत युद्धामुळें उत्पादनशक्ति इतकी बेसुमार वाढली आहे कीं, महायुद्धानंतर ते देश कमालीच्या कमी किमतीला आपला माल हिंदुस्थानांत विकतील. हिंदुस्थानांतील कारखानदारांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवून हात राखून व्यवहार केला पाहिजे आणि उद्योगधंद्यांतील नफ्याचा कांहीं भाग बाजूला काढून युद्धोत्तर येणाऱ्या मंदीच्या आपत्तींची तरतूद करून ठेवली पाहिजे.

### चौकशी आणि निरीक्षण करून मग कराचें प्रमाण ठरवा

"हा कर सरकार बसविणारच असेल तर तो बसविण्यापूर्वी त्यांनीं उद्योगधंद्यांच्या स्थितीचें निरीक्षण करून त्यांची वर्गवारी करावयास पाहिजे आणि मग कमी अधिक प्रमाणांत कर बसविला पाहिजे. सर्व तऱ्हेच्या व्यापाऱ्यांना कराचें एकच माप लागू केलें तर त्यांच्यावर आकाशच कोसळल्यासारखें होईल. युद्धाकरितां म्हणून सरकारनें ज्या व्यापाऱ्यांकडून माल घेतला असेल किंवा ज्या कारखानदारांना कंत्राटें दिलीं असतील अशांच्याकडून हवा तर सरकारनें कर घ्यावा. अनेक व्यापाऱ्यांना असें वाटत आहे कीं, या कराशीं आपला कांहीं संबंध नाहीं. तेव्हां या चळवळींत पडा कशाला? पण ही त्यांची समजूत अगदी भ्रामक आहे. कारण मोठ्या कारखानदारांच्या नफानुकसानीवर किरकोळ व्यापाऱ्यांचें नफानुकसान अवलंबून असतें. सारांश, कारखानदार व व्यापारी, मग तो लहान असो किंवा मोठा असो, प्रत्येकानें या बिलाविषयीं तीव्र नापसंती दर्शविली पाहिजे."

### संदेश वाचन

सभेस आलेल्या संदेशांचें श्री. गो. द. आपटे, ऑडिटर, चेंबरचे एक चिटणीस ह्यांनीं वाचन केल्यानंतर मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे दुसरे संयुक्त चिटणीस श्री. आत्माराम राघजी भट, एम. कॉम. यांनीं खालीलप्रमाणें ठराव मांडला:—

### निषेधाचा ठराव

"पुणें येथें मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्रीज या संस्थेनें सराफ असोसिएशन, हार्डवेअर अँड आयर्न मर्चंट्स असोसिएशन, ब्रास अँड कॉपर मर्चंटस् असोसिएशन व पुणें कारखानदार संघ यांच्या सहकार्यानें भरवलेली व्यापारी, कारखानदार, बँकर, विमाव्यवसायी आणि देशी व्यापारउदिमांच्या वाढीचे हितचिंतक यांची ही सभा, जादा नफ्यावरील कराची कल्पना अकाली असून त्याच्या योजनेमुळें प्रत्यक्ष कराचा बोजा निष्कारण डोईजड होणार असल्यामुळें, त्याबद्दल तीव्र नापसंति व्यक्त करीत आहे.

"या सभेचें असें ठाम मत आहे कीं, या करामुळें व्यापारउदिमांतील लोकांच्या धारणाशक्तीवर मोठें दडपण पडणार असून हिंदुस्थानाच्या औद्योगीकरणाला पायबंद बसणार आहे. तसेंच, व्यापारउदिमांतील फायद्याचें सर्वसाधारण मान ठरविण्याची जादा नफ्यावरील बिलांतील पद्धति व्यापारउदिमाला अन्याय करणारी असून त्यामुळें जादा नफ्यावरील कराचा बोजा अकारण वाढणार आहे.

"या सभेच्या मतें जादा नफ्यावरील कराच्या आकारणीचा पन्नास टक्क्यांचा दर व्यापारउदिमाला झेपण्यासारखा नसून त्यामुळें विद्यमान व पुढें निघणाऱ्या उद्योगधंद्यांना मोठा तडाखा बसणार आहे. या सभेची हिंदुस्थान सरकारला अशी आग्रहाची विनंति आहे कीं, त्यांनीं व्यापारउदिम व शेती यांच्या हितसंरक्षणाच्या दृष्टीनें हें जादा नफ्यावरील कराचें बिल परत घ्यावें.

"जादा नफ्यावरील कराच्या बिलाचा विचार करण्याकरतां नेमलेली सिलेक्ट कमिटी प्रातिनिधिक झालेली नाहीं याबद्दल ही

सभा खेद व्यक्त करीत आहे या सभेची सरकारला अशी अग-त्याची सूचना आहे कीं, व्यापार उदिमांतील लोकांची या बिला-बाबतची बाजू नीट ध्यानीं यावी म्हणून सिलेक्ट कमिटीच्या बैठकींना प्रमुख व्यापारी संस्थांच्या प्रतिनिधींना पाचारण करावें.

" हा ठराव हिंदुस्थान सरकारच्या फडणिसाकडे पाठविण्याचा अधिकार ही सभा अध्यक्षांना देत आहे. "

वरील ठरावावरील भाषणांत श्री. आ. रा. भट हे म्हणाले:—

### श्री. भट यांचें भाषण

" महायुद्धामुळें राष्ट्रीय संरक्षण आणि तद्विषयक इतर खातीं यांच्यामुळें नवीन मागणी उत्पन्न होऊन खरोखरच प्रमाणाबाहेर नफा होऊं लागल्याचें सिद्ध झालें आणि मग सरकारनें,त्याचा कांही थोडा भाग कर म्हणून घेण्याचें ठरविलें तर त्याला कोणी विरोध करील असें वाटत नाहीं. परंतु सरकारानें युद्धाला प्रारंभ होऊन सहा महिनेहि झाले नाहींत तोंच हें जादा नफ्यावरील कराचें बिल घिसाडघाई करून पुढें आणावें व त्याची आकारणी युद्धाला प्रारंभ होण्यापूर्वी पासूनच्या म्हणजे १ एप्रिल १९३९ पासून झालेल्या नफ्यावर करण्यास पुढें यावें हें आश्चर्य होय.

### योजनेविरुद्ध अनेक आक्षेप

"या योजनेविरुद्ध पहिला आक्षेप असा कीं, हिंदुस्थान हा साम्राज्यांतर्गत देश असल्यामुळें तो युद्धमान देश असला तरी युद्ध-क्षेत्रापासून तो दूर आहे.सबब ग्रेटब्रिटन व हिंदुस्थान यांमधील परिस्थिति सारखी नाहीं.ग्रेटब्रिटननें जादा नफ्यावर कर बसविला असला तरी साम्राज्यांतर्गत इतर देशांनीं अजून तो बसविलेला नाहीं. सीलोनमध्यें असा कर बसविण्याची सूचना फेटाळली गेली. ही कराची योजना अकाली पुढें आली आहे. अजून व्यापारउदिमाला टिकाऊ स्वरूपाची तेजीच आलेली नाहीं. सबब व्यापारी-कारखानदारांना प्रमाणाबाहेर नफा होऊं शकेल अशी परिस्थितीच उत्पन्न झालेली नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, विद्यमान कित्येक धंद्यांना महायुद्धामुळें कच्च्या मालाचा तुटवडा पडत आहे. जो कच्चा माल मिळत आहे त्याच्या किंमती चढल्या आहेत. महायुद्धाच्या परिस्थितीमुळें नव्यानें उत्पन्न झालेले प्रश्न कारखान्याच्या चालकांना अजून सोडवतां आलेले नाहींत. त्याबरोबरच हीहि गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, गेलीं दहा वर्षें कमी अधिक प्रमाणांत मंदीची गेलीं व त्यामुळें अनेक कारखाने नुकसानींत चालत होते. महायुद्धामुळें बदललेल्या परिस्थितीला अनुरूप अशी उत्पादनाची व्यवस्था लागून मंदीच्या काळांत झालेलें नुकसान कांहींतरी भरून येण्यापूर्वीच जादा नफ्यावरील कराची घोरपड उद्योगधंद्यांच्या गळयांत अडकवल्यानें विद्यमान धंदे भरभराटीस लागणार नाहींत आणि नवीन निघणें कठीण होईल.

### अतिव्याप्ति आणि आकारणीची सदोष पद्धति

"या बिलाविरुद्ध आणखी एक आक्षेप असा आहे कीं,या बिलाचा हेतु महायुद्धजन्य परिस्थितीमुळें व्यापारउदिमाला जो जादा नफा होण्यासारखा आहे त्याचा हिस्सा सरकारी तिजोरीला मिळावा हा आहे असें या बिलाच्या उद्देश-पत्रकावरून दिसतें. परंतु बिल मात्र महायुद्धोपयोगी सामानाचें उत्पादन किंवा विनिमय करणाऱ्या व्यक्ती व कंपन्या यांपुरतेंच मर्यादित करण्यांत आलेलें नाहीं. बँका, विमा कंपन्या, सिनेमा कंपन्या यांसारख्या महायुद्धाशी संबंध न येणाऱ्या धंद्यांतील नफ्यालाहि हें बिल लागू करण्यांत आलें आहे. फायनॅन्स बिलाप्रमाणें हें करयोजनेचेंच बिल असून त्याचें आयुष्य मात्र एक वर्षापुरतें मर्यादित नाहीं.जादा नफा ठरविण्यासाठीं म्हणून व्यापार उदिमाचा नेहमीचा नफा ठरविण्याकरितां जी पद्धति व कालमान ठरविण्यांत आलें आहे तें सदोष आहे. सरकारनें बिलांत नियुक्त केलेलीं वर्षें मंदीच्या फेऱ्यांतील होतीं. तीं आधारभूत धरलीं गेल्यास जादा नफा वाजवीपेक्षा अधिक धरला जाणार आहे. या करामुळें एकंदर व्यापार उदिमावर दडपण पडून त्याचा एक अप्रत्यक्ष परिणाम म्हणून शेतीच्या मालाच्या बाजारावर मंदीची छाया पडणें अपरिहार्य होईल. या करामुळें औद्योगिक कंपन्यांच्या शेअर्सच्या किंमती उतरतील व त्या प्रमाणांत भांडवलाला कात्री लागेल. घसाऱ्याची तरतूद, दुहेरी कर आकारणी, भागीदारी पेढ्यांचें उत्पन्न वगैरेसंबंधींचे या बिलांतील भाग दोषार्ह आहे.

### व्यापारी प्रतिनिधींचा सल्ला घ्या

" वरील आक्षेप बिलाचें सदोष स्वरूप दर्शविण्यास पुरेसे आहेत. असेंब्लीनें कर आकारणीचें तत्त्व मान्य करून त्या कराच्या बिलाच्या तपशीलाचा विचार करण्याकरितां तें सिलेक्ट कमिटीकडे विचारार्थ सोपविलें आहे. या कराचे अनिष्ट परिणाम शक्य तितके कमी होण्याकरितां हें बिल ज्या व्यापार-उदीमाला लागू व्हावयाचें आहे त्याचे पुरेसे प्रतिनिधी या सिलेक्ट कमिटींत असावयास पाहिजे होते. परंतु दुर्दैवानें तसें घडलें नाहीं. या कराच्या कक्षेंत येणाऱ्या कंपन्यांचे हजारो शेअर होल्डरांना या बिलाची झळ लागणार आहे व त्याचा अप्रत्यक्ष परिणाम सर्व देशाच्या आर्थिक संघटनेवर होणार आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन सिलेक्ट कमिटीनें प्रमुख व्यापारी संस्थांच्या प्रतिनिधींचा सल्ला घेऊन ही कराची योजना शक्य तितकी कमी बोचक करणें आवश्यक आहे."

### श्री. बाबूलाल नानचंद आणि श्री. रा. न. अभ्यंकर यांचीं भाषणें

वरील ठरावास अनुमोदन देतांना शेट बाबूलाल नानचंद मोतीवाले यांनीं असें सांगितलें कीं, सीलोन कायदेमंडळांत अशाच स्वरूपाचें बिल आलें असतां जसें तें तेथील सभासदांनीं नापास केलें तशींच मध्यवर्ती असेंब्लींतील सभासदांनीं या बिलाची वाट लावली पाहिजे. सरकारला जर व्यापाऱ्यांच्या नफ्यांत भागीदारी पाहिजे तर त्यांनीं ज्या व्यापाऱ्यांना तोटा होत आहे त्यांच्या तोट्यांतहि भागीदारी स्वीकारावी हें रास्त आहे. ठरावाला पुष्टि देतांना श्री. रा. न. अभ्यंकर यांनीं असें सुचविलें कीं, असेंब्लींतील काँग्रेस सभासदांनीं हें बिल जेव्हां मताकरितां असेंब्लीपुढें ठेवण्यांत येईल त्यावेळीं मुद्दाम हजर राहून या बिलाविरुद्ध त्यांनीं आपलीं मतें द्यावीं आणि हिंदुस्थानांतील जनतेच्या संमतीनें हें बिल पास झालेलें नाहीं हें जगास दाखवावें.

### ठरावास मान्यता आणि आभारप्रदर्शन

वरील आशयाचीं भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं ठराव सभेपुढें मताकरितां ठेवला व सभेनें तो एकमतानें मंजूर केला. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचे श्री. चें. गो. आगाशे यांनीं अध्यक्षांचे आभार मानल्यावर सभा समाप्त झाली.

---

### मुंबई सरकारचें जंगल खातें

मुंबई प्रांताच्या जंगल खात्याचे ताब्यांत १०,७२९ चौरस मैल जंगल आहे. १९३८–३९ मध्यें जंगल खात्यास ४० लक्ष, ९० हजार रुपये उत्पन्न झालें, त्यांतून खर्च वजा जातां सरकारास निव्वळ ११ लक्ष, ७२ हजार रुपये मिळाले.

## इंग्लंडच्या वैभवाचें रहस्य

पांच पिढ्यांपूर्वीच्या इंग्लंडमध्यें आजच्या इतकीच नैसर्गिक संपत्ति होती. बंदरें, चांगलें हवापाणी, रोगजंतूंचा अभाव, खनिज पदार्थांची सुबत्ता, इत्यादि सर्व गोष्टी त्या वेळींहि होत्या. तथापि इंग्लंड, वेल्स, स्कॉटलंड आणि आयर्लंड ह्या सर्वांची मिळून पुरी १ कोटिहि लोकसंख्या १७५० मध्यें भरत नव्हती. त्याचप्रमाणें आजच्या लोकांच्या रहाणीचे मानानें त्यावेळची रहाणीहि कनिष्ट दर्जाचीं होती. इंग्लंडमध्यें कोळसा मुबलक होता, तरी तो खणून कसा काढावयाचा, हा प्रश्न होता, कोळशाच्या खाणींत साठणारें पाणी दूर करण्याची युक्ति कोणासच अवगत नव्हती. १७०५ सालीं न्यू कॉमेननें पाणी काढण्यासाठी वाफेच्या इंजनाची योजना केली. तें इंजन पुढें जेम्स वॉटनें सुधारलें. आतांपर्यंत लोखंड वितळून काढण्यासाठी लाकडें जाळण्यांत येत, आणि त्यास अतिशय लाकूड लागे. कोळशाच्या भट्टींत लोखंड चांगल्या तऱ्हेनें निघतें, हा शोध ह्याच सुमारास लागला. लोखंड मुबलक निघूं लागलें आणि त्याचीं यंत्रें बनविण्याकडे लोक लक्ष पुरवूं लागले. अशा रीतीनें १८ व्या शतकाचे उत्तरार्धांत औद्योगिक क्रांतीस प्रारंभ झाला.

उत्पादन केलेला कोळसा तेथून कसा हलवावयाचा, हा प्रश्न खाणींच्या इंजिनियरांचेपुढें होता, आणि त्यांतच आजच्या आगगाड्यांचा उगम आहे. जॉर्ज स्टीफनसननें ताशीं २८ मैल जाणारें आगगाडीचें इंजन तयार केलें आणि त्यांत सुधारणा होत होत आगगाड्यांचा सबंद जगभर प्रसार झाला. वाफेच्या इंजनावर चालणाऱ्या आगबोटींनीं आगगाड्यांस प्रारंभ होण्यापूर्वींच दहा वर्षें ॲटलांटिक महासागर ओलांडला होता. अशा रीतीनें, मोठ्या प्रमाणावर, जागतिक व्यापार खुला झाला. ब्रिटिश कोळसा, यंत्रें आणि कारखाने ह्यांचे सहायानें उत्पादन वाढून ब्रिटिश व्यापाराचें मान पार बदललें. सबंद जगांतील कानाकोपऱ्यांतून कच्चा माल इंग्लंडकडे येऊं लागला आणि त्यांतील संपत्तीचा फायदा इंग्लंडला मिळूं लागला. १८ व्या शतकांत, ब्रिटिश जनता स्थानिक उत्पादनावरच उदरनिर्वाह करीत असे आणि फक्त श्रीमान मनुष्यासच विदेशांतून येणारा एकादा जिन्नस उपलब्ध होऊं शके. पूर्वीच्या राजे लोकांसहि जीं फळें दुर्मीळ होतीं, तीं ब्रिटिश लोकांस आतां गल्लोगल्लीं विकत मिळूं लागलीं आहेत. स्कँडिनेव्हियांतील लाकडांचा घरांचे बांधणींत उपयोग होतो, लँकेशायरमधील लक्षावधि लोकांचें पोट अमेरिका आणि इजिप्त येथून येणाऱ्या कपाशीवर अवलंबून आहे, आणि ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड येथील लोकरीपासून केलेले कपडे प्रत्येक घरांत वापरले जात आहेत. मलाया आणि सिलोन येथील रबरापासून मोटारींच्या आणि सायकलींच्या धावा करण्यांत येत आहेत. ह्या सर्वांचा मोबदला इंग्लंडला द्यावा लागतो, हें उघड आहे. प्रत्येक आठवड्यास पक्क्या मालानें भरलेल्या अनेक आगबोटी ब्रिटिश किनारा सोडतात आणि पंचमहासागरांतून संचार करून तो माल परदेशांस पोचवितात. वहातुकीच्या धंद्यांत इंग्लंडचें वर्चस्व आहे. अशा रीतीनें इंग्लंडचें वैभव आणि संपत्ति व्यापारावर आधारलेली आहे आणि तो व्यापार बंद पडला तर त्या देशास दोन शतकांपूर्वींची स्थिति पुनः प्राप्त झाल्याविना रहाणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्याहूनहि दुःस्थिति येईल, कारण आतां इंग्लंडची लोकसंख्या पुष्कळच वाढलेली आहे. १८ व्या शतकांतील औद्योगिक क्रान्ति आणि व्यापाराच्या वर्धनासाठी त्यावेळीं झालेले प्रयत्न, ह्यांतच इंग्लंडच्या वर्चस्वाचें मूळ आहे.

## शांततेचा काळ, हा अपवाद होय!

गेलें महायुद्ध संपून २५ वर्षेंहि लोटलीं नाहींत, इतक्यांतच पुनः नवीन मोठ्या युद्धास प्रारंभ झाला आहे, हें पाहून पुष्कळांस नवल वाटतें. तथापि, युद्धपरिस्थिति हीच नेहमीची परिस्थिति होय असा जुना अनुभव आहे. शांततेचा काळ हाच अपवादात्मक असे. १६१८ ते १६४८ पर्यंत जर्मनींत अखंड युद्ध चाललें, तें फ्रान्स आणि इंग्लंड ह्यांचेमधील १३३८ ते १४५३ पर्यंत, ११५ वर्षें चाललेल्या युद्धाचे मानानें अल्पकालीनच म्हटलें पाहिजे. नेपोलिअनच्या लढाया २२ वर्षें चालल्या होत्या. रोमन साम्राज्याचा नाश झाल्यापासून १९ व्या शतकाचे प्रारंभापर्यंत युरोपांत दीर्घकाळ शांतता कधींच नांदली नाहीं. पुढेंहि युद्धें होत गेलीं, तथापि फ्रान्स आणि प्रशिया ह्यांमधील कांहीं महिने चाललेल्या युद्धानंतर १९१४ चें, चार वर्षें चाललेलें महायुद्ध हेंच महत्त्वाचें होय. किरकोळ भांडणांचा बाऊ करणें चुकीचें आहे आणि तीं परस्पर चर्चा आणि वाटाघाटी करून मिटवणें युद्ध करण्यापेक्षा अधिक शहाणपणाचें आहे, हें आतां सर्वांस कळून चुकलें आहे. नवीन पद्धतीच्या शस्त्रांमुळें प्राणहानि फार होते, ती टाळण्याचा प्रयत्न शक्य तेवढा करण्याची पुढाऱ्यांची खटपट असते. गेल्या महायुद्धांत १ कोटि सैनिक आणि १ कोटि, ३० लक्ष इतर लोक मृत्युमुखीं पडले, ह्याची आठवण अद्याप ताजी आहे. विमानदलांचा युद्धांत वाढता उपयोग होऊं लागल्यामुळें, रणांगणाचें क्षेत्र आतां मर्यादित राहिलेलें नाहीं. लढाईस न गेलेल्या, अगदीं अंतर्भागांत रहाणाऱ्या लोकांवरहि विमानांतून हल्ला केव्हां होईल, हें सांगतां येणें कठीण आहे.

---

## श्री. शिंदे ह्यांचें चांभार विद्यार्थी मंडळातर्फे अभिनंदन

येथील चांभार विद्यार्थीमंडळातर्फे श्री. शिंदे चामड्याच्या धंद्याचें शिक्षण इंग्लंडमध्यें पूर्ण करून स्वदेशीं सुखरूप परत आल्याबद्दल त्यांचे अभिनंदनार्थ गेल्या बुधवारीं सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली होती. सभेस चांभार समाजांतील प्रमुख गृहस्थ उपस्थित होते आणि त्याचप्रमाणें इतर जातींची व वर्गांची मंडळीहि हजर होती. प्रो. काळे, श्री. गोपाळराव कारंडे, श्री. खडतरे, डॉ. नवले, श्री. काळे प्रभृति वक्त्यांचीं श्री. शिंदे ह्यांच्या गुणवर्णनपर भाषणें होऊन त्यांस निरनिराळ्या संस्थांच्या तर्फेनें हार घालण्यांत आले. श्री. शिंदे ह्यांनीं विनययुक्त भाषण करून आपण स्वतःचा समाज आणि देश ह्यांच्या हितासाठी झटूं असें आश्वासन दिलें.

---

## लिव्हिंगस्टनची कन्या

आफ्रिकेंतील अंतस्थ भागांचें संशोधन करणारा सुप्रसिद्ध डेव्हिड लिव्हिंगस्टन ह्याची कन्या मिसेस ॲना मेरी लिव्हिंगस्टन विल्सन ही नुकतीच, आपल्या वयाच्या ८१ व्या वर्षी मरण पावली. लिव्हिंगस्टन झांबेशीमध्यें संचार करीत होता त्या वेळीं ॲनाचा दक्षिण आफ्रिकेंत जन्म झाला आणि दोन वर्षांनीं लिव्हिंगस्टनला आपणांस ॲना नांवाची मुलगी असल्याचें समजलें. त्या दोघांची प्रत्यक्ष भेट होण्यास आणखी तीन वर्षें लागलीं. ॲनाला आपल्या नांवाच्या मोठेपणाबद्दल अतिशय अभिमान वाटत असे.

---

## तेव्हां आणि आतां

गेल्या महायुद्धापेक्षा चालू युद्ध ही अधिक खर्चाची बाब आहे. तेव्हांपेक्षा आतां प्रत्येक लष्करी तुकडीवर दुप्पट खर्च करावा लागतो. लढाऊ जहाजें आणि विमानें हीं तयार करण्यासहि अधिक खर्च येतो. गेल्या महायुद्धापूर्वी ग्रेटब्रिटनचें जेवढें राष्ट्रीय कर्ज होतें, त्याचेपेक्षा आज तें १२ पट झालें आहे. गेल्या महायुद्धापूर्वी तेथें प्राप्तीवरील कर २० शिलिंगास १$\frac{1}{4}$ शिलिंग होता. चालू युद्धाचे सुरवातीस तो ५$\frac{1}{2}$ शिलिंग झाला आणि आतां तो ७$\frac{1}{2}$ शिलिंग झाला आहे. १९१४ सालीं सर्वांत ज्यास्त सुपर टॅक्सचा दर २० शिलिंग मिळकतीस १ शिलिंग ४ पेन्स होता; आज तो ९ शिलिंग ६ पेन्स आहे. म्हणजे, २५ वर्षांपूर्वीच्या मानानें आज ग्रेटब्रिटनमध्यें करभार पुष्कळच वाढलेला आहे. तथापि, ग्रेटब्रिटनचा सुवर्णसंचय १९१४ सालीं ६० कोटि रुपयांचा होता; आजच्या त्याच्या सुवर्णसंचयाची किंमत ९०० कोटींहून अधिक आहे. ग्रेटब्रिटननें सुमारें ५०अब्ज रुपये परदेशांत गुंतविलेले आहेत, ते कच्चा माल, अन्नपुरवठा, इत्यादींच्या खरेदीस उपयोगी पडण्याजोगें आहेत. ह्या उलट, जर्मनीजवळ शिलकी क्रयसाधन मुळींच नाहीं. ग्रेटब्रिटनचें वार्षिक राष्ट्रीय उत्पन्न गेल्या महायुद्धापूर्वी सुमारें ३४ अब्ज रुपये होतें, तें आतां ७५ अब्जांहून अधिक आहे. म्हणजे, १९१४ ते १८ चे दरम्यान ग्रेटब्रिटननें ज्या प्रमाणांत कर्ज उभारलें, त्या प्रमाणांत आज तें उभारावयाचें म्हटल्यास, त्या देशास आतां तेव्हांपेक्षा ५० अब्ज रुपयांचें अधिक कर्ज काढतां येईल. कर्जाच्या रकमेबरोबर त्याच्या व्याजाच्या दराचाहि विचार केला पाहिजे. गेल्या महायुद्धाचे वेळीं सरकारास ४ ते ५$\frac{1}{2}$ टक्के व्याज द्यावें लागलें. आतां कांहीं वर्षे व्याजाचे दर उतरलेले असल्यामुळें ४ टक्क्यांपेक्षा अधिक व्याज ह्यावेळीं द्यावें लागणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. २$\frac{1}{2}$% नेंहि कर्ज उभारतां येतील अशी मि. जे. एम. केन्स ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञास उमेद आहे. वाढत्या औद्योगिक उत्पादनास आवश्यक तेवढ्याच चलनी नोटा सरकारनें काढल्या म्हणजे त्यासंबंधांत भीति बाळगण्याचें प्रयोजन रहात नाहीं. युद्ध दीर्घ काळ चाललें तरी ग्रेटब्रिटन त्याचा आर्थिक बोजा उचलण्यास समर्थ आहे, असा वरील विवेचनाचा मथितार्थ आहे.

### रिझर्व्ह बॅंकेच्या भागांची क्षेत्रवार वाटणी

| क्षेत्र | ३०–१२–३८ | ३१–१२–३९ |
|---|---|---|
| मुंबई ... | २,०५,५०८ | २,०७,३९७ |
| कलकत्ता ... | १,२९,८०० | १,२१,३३५ |
| दिल्ली ... | ९३,३१४ | ९२,७३४ |
| मद्रास ... | ५९,९५१ | ९०,१०९ |
| रंगून ... | १८,४२७ | १८,४९५ |

### जगांतील धातूंचा साठा

जगांतील धातूंच्या साठ्याची वाटणी खालील प्रमाणें आहेः—

| | |
|---|---|
| ब्रिटिश साम्राज्य | ३१·१ % |
| रशिया | ९·९ % |
| जर्मनी | ८·८ % |
| फ्रान्स | ६·० % |
| जपान | ३·९ % |
| इटली | १·५ % |

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल्. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियांची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २
बिझिनेस ऑफिस : ९९२A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay
716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

सुखाचा शोध
मिनर्व्हा १८ वा आठवडा

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

**सरकारी आणि निमसरकारी रोखे**

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११०–१३ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... ... ... | १०१—९ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९१—४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०१—४ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ८९—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९४—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०४—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०३—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११०—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२०—० |

**मंडळ्यांचे भाग**

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

**बँका**

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३६—८ |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% ... ... | १०२—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३४—३ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १४९०—० |
| बांबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—० |

**वीज**

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२८–१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | ११९—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३२७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४७०—० |

**रेल्वेज**

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% ... ... | ६७—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९७७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५६—४ |

**इतर**

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २०५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४७—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १८–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३६–१० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४२४०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | १९२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १३६—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३५५—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८५७—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | ११६—० |




एजंटः—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७२ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या
**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल अशुअरन्स कं. लि.**
ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय

हयातींतील विम्यावर दर हजारीं **५०**

हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )
मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग,
फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं **६०**

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service.

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

**Last year 1937-38**

**Exceeds**

**Rs. 3 CRORES**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,

POONA CITY.



## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. धुं. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ६००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांची तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,

तुळशीबागरोड : : नागपूर शहर



## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात.

केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.

व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.






## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात होणें, दुखणें, शोध्यास लाभ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस १ रुपये, टपालखर्च १२ आणे, एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज ( डि. नं. १ )

२५३।१ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.